**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**दिनांक १२ एप्रिल २०२६**

**ठळक बातम्या..**

1. **ज्येष्ठ गायिका आशा भोसले यांचं निधन/ उद्या संध्याकाळी शिवाजी पार्क स्मशानभूमीत अंतिम संस्कार**

2. **महानिर्मितीच्या छत्तीसगडमधील गारे पालमा सेक्टर -2 कोळसा खाणीतून पहिल्या कोळसा रेल्वेरॅकचं कोराडी औष्णिक विद्युत केंद्रात आगमन**

3. **नागपूर शहरातील प्रत्येक नवीन बांधकामात पार्किंगला प्राधान्य देण्याचे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आणि मुख्यमंत्री फडणवीस यांचे निर्देश**
4. **अकोला इथं आज 43 पूर्णांक 1 दशांश अंश सेल्सिअस इतक्या कमाल तापमानाची नोंद**

**आशा भोसले**

ज्येष्ठ गायिका आशा भोसले यांचं आज मुंबईत निधन झालं. त्या ९२ वर्षांच्या होत्या. त्यांचे चिरंजीव आनंद भोसले यांनी हीमाहिती दिली. आशा भोसले यांच्या निधन वार्तेनं सर्वत्र शोककळा पसरली आहे. आशा भोसले यांनी विविध प्रकारची गाणी गायली .नाट्य संगीतापासून कॅब्रे आणि पॉप गाण्यांपर्यंत त्यांनी सगळे प्रयोग यशस्वी केले. त्यामुळे गेली ८ दशकं पिढी दर पिढी रसिकांना त्यांचाआवाज जवळचा आणि आपलासा वाटत राहिला. ऐकुया त्यांच्या कारकिर्दीवर प्रकाश टाकणारा हा विशेष रिपोर्ट आमच्या प्रतिनिधींकडून

१९४३ मधे माझा बाळ या चित्रपटाकरता आशा भोसले यांनी पहिलं गाणं ध्वनिमुद्रित केलं.त्यानंतर भारतीय शास्त्रीय संगीतावर आधारित गाण्यांपासून नाट्यसंगीत, चित्रपट संगीत, गझल, लोकसंगीत, रवींद्र संगीत एवढंच नाही तर पाश्चात्य पॉप संगीतातही त्यांच्या बहु आयामी आवाजाने वेगळं स्थान निर्माण केलं होतं. 'इन आंखों की मस्ती', 'दम मारो दम', 'पिया तू अब तो आजा' और 'चुरा लिया ह तुमने' यांसारख्या धाडसी आणि लोकप्रिय गाण्यां सोबतच 'आगे भी जाणे ना तू' या सारख्या चिंतनशील गाण्यांपासून 'सलोना सा साजन ह सारख्या लडिवाळ

गाण्यांमधून त्यांनी श्रोत्यांच्या मनावर गरुड केलं. 'रंगीला' मधील गाण्यांतून नव्या पिढीलाही त्यांनी आपलंस केलं. देशोदेशीच्या श्रोत्यांना त्यांच्या गायनाने भुरळ घातली होती. अनेक राष्ट्रीय पुरस्कार, पद्मविभूषण सन्मान आणि दादासाहेब फाळके पुरस्कारासह अनेक प्रतिष्ठित पुरस्कार त्यांना मिळाले आहे ग्रॅमी पुरस्कारासाठी देखील त्यांना दोन वेळा नामांकन मिळालं होतं. १२ हजार गाणी ध्वनिमुद्रित करण्याच्या त्यांच्या विक्रमाची नोंद गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्सने घेतली होती. गायनाच्या जाहीर कार्यक्रमांमधे त्यांच्यातल्या अष्टपैलू कलाकाराचं दर्शन घडत असे. २०१३ मधे आलेल्या माई या चित्रपटात त्यांनी मध्यवर्ती भूमिका केली होती.केव्हा तरी पहाटे, उषा काल होता यांसारखी मराठी गाणी, लावण्या यामुळे मराठी सिने विश्वात त्यांनी अमीट अशी छाप सोडली आहे. जत्रा रे जत्रा मधील त्यांची गाणी विशेष लोकप्रिय ठरली. आशा भोसले यांच्या जाण्यानं भारतीय संगीत विश्वाच कधीही भरून न येणार नुकसान झालं आहे.

**आशा भोसले श्रद्धांजली**

आशा भोसले यांच्या पार्थिवावर उद्या संध्याकाळी शिवाजी पार्क स्मशानभूमीत अंतिम संस्कार करण्यात येणार आहेत. आशा भोसले यांच्या निधन वार्तेनं सर्वत्र शोककळा पसरली आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु यांनी आशा भोसले यांच्या निधनामुळे संगीत क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाल्याचं शोकसंदेशात म्हटलं आहे. आशा भोसले यांच्या निधनामुळे आपल्याला तीव्र दुःख झालं असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. आपल्या अवीट स्वरांनी, विविध संगीत प्रकार लीलया गाण्याच्या क्षमतेने आणि संगीतातील व्यापक योगदानाने संगीत रसिकांच्या अनेक पिढ्यांवर राज्य करणाऱ्या आशा भोसले यांना भावपूर्ण श्रद्धांजली, असं राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी आपल्या

शोकसंदेशात म्हटलं आहे.आशाताई आणि मंगेशकर कुटुंबाने संगीताची अविरत सेवा केली. लतादीदींच्या रुपात संगीतातला पहिला तारा निखळताना आपण पाहिला आणि आता आशाताईंच्या निधनाने संगीतातला दुसरा ताराही निखळल्याची भावना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केली. आशा ताईंनी अखेरच्या श्वासापर्यंत आपलं जीवन संगीत क्षेत्राला वाहून घेतलं होतं. आज आपण अशा गायिकेला मुकलोय जिने भारताचं नाव जगभरात प्रसिद्ध केलं. अशा शब्दात केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी शोक व्यक्त केला आहे.आशाताईंनी विविध भाषेत गाताना मराठी भाषेची कास सोडली नाही. आज महाराष्ट्राच्या मातीतील हिरा आपण गमावला. या लोकप्रिय गायिकेच्या जाण्याने संगीत क्षेत्राची हानी झाली आहे

अशा शब्दांत काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी श्रद्धांजली व्यक्त केली आहे. संगीत विश्वातील देश विदेशातील मान्यवरांनी आशा भोसले यांना श्रद्धांजली अर्पण केली आहे.

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

महानिर्मितीच्या छत्तीसगड राज्यातील गारे पालमा सेक्टर -2 या कोळसा खाणीतून कोराडी औष्णिक विद्युत केंद्रात येणाऱ्या पहिल्या कोळसा रेल्वेरॅकचं आज आगमन झालं. मुख्यमंत्री आणि राज्याचे ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते या पहिल्या रॅकचं स्वागत करण्यात आलं. याप्रसंगी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे उपस्थित होते . या प्रकल्पामुळे कोराडी वीज प्रकल्पाला कोळसा पुरवठा अधिक सुलभ होणार असून, राज्याच्या वीज निर्मितीला मोठं बळ मिळणार आहे, असं फडणवीस यांनी यावेळी पत्रकारांशी बोलताना सांगितलं.

या प्रकल्पाची सुरुवात ऊर्जामंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या कार्यकाळात झाली होती. ही खान सुरू होण्यासाठी जवळपास आठ वर्षे लागली असून, तिचे आयुष्य पुढील ७७ वर्षे असल्यानं कोळशाची कमतरता भासणार नाही, असंही फडणवीस यांनी नमूद केलं

**विकास प्रकल्प आढावा**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आणि यांनी आज नागपूर शहरातील विविध विकास प्रकल्पांचा घेतला आढावा घेतला. यावेळी प्रत्येक नवीन बांधकामामध्ये पार्किंगसाठी मुबलक जागा ठेवण्याला प्राधान्य द्या, असे स्पष्ट निर्देश केंद्रीय मंत्री नितीन गडकरी तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रशासनाला दिले आहेत. गरज भासल्यास पार्किंगसाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करून तोडगा काढावा, अशा सूचनाहि गडकरी यांनी दिल्याआहेत . नागपुरात मुख्यमंत्री सचिवालयात आयोजित बठकीत शहरातील विविध प्रकल्पांचा आढावा घेण्यात आला. नागपूर महानगरपालिकेअंतर्गत १ लाख लोकसंख्या असलेल्या वस्त्यांमध्ये झोननिहाय भाजी बाजार, मटन-मच्छी मार्केट,फूड मॉल व हॉकर झोन उभारण्याबाबत बठकीत चर्चा झाली. ही कामे पूर्ण करताना पार्किंगची योग्य ती व्यवस्था करण्याचे निर्देश फडणवीस यांनी दिले त्यासाठी 'एकात्मिक विकास नियंत्रण

व प्रोत्साहन नियमावली'चा आधार घ्यावा आणि  आवश्यक बदल करावे अशा सूचना त्यांनी यावेळी दिल्या.

**टूर सर्कीट सहल**

महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन विभागामार्फत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचे औचित्य साधून दि. १३ आणि  १४ एप्रिल रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर टूर सर्कीट सहलीचं  आयोजन करण्यात आलं आहे. मुंबई, नाशिक आणि नागपूर या ठिकाणी भेट देणाऱ्या पर्यटक आणि अनुयायींसाठी ही  सहल निःशुल्क असणार आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर टूर सर्कीट सहलीमध्ये मुंबईतील दादरमधील चैत्यभूमी, राजगृह, प्रिटींग प्रेस, परळ येथील बि.आय.टी चाळ, वडाळा येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, फोर्ट येथील सिद्धार्थ महाविद्यालय या स्थळांचा समावेश आहे. तर नाशिकमधील मुक्तीभूमी, त्रिरश्मी लेणी आणि काळाराम मंदिर या स्थळांचा समावेश आहे. तसेच नागपूर येथील दिक्षाभूमी, चिंचोली येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर संग्रहालय, कामठी येथील ड्रॅगन पॅलेस या स्थळांचा समावेश आहे. १३ आणि  १४ एप्रिल रोजी सकाळी १० वाजता टूर सर्कीट सहलीला सुरुवात होईल. मुंबईतील टूर सर्कीट सहलीची सुरुवात चैत्यभूमी येथून , नाशिकमधील गडकरी चौक आणि नागपूरमधील दिक्षाभूमी येथून टूर सर्कीट सहलीला सुरुवात होईल. या सहली अंतर्गत दररोज विशेष बसेस सोडण्यात येतील.

**भीमगर्जना**

महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागातर्फे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त ‘भीमगर्जना’ या विशेष सांस्कृतिक कार्यक्रमाचं  आयोजन महाराष्ट्रातील सहा महसूल विभागात करण्यात आल आहे. या कार्यक्रमाच्या माध्यमातून भीम गीतांची संगीतमय मानवंदना अर्पण करून डॉ. आंबेडकरांच्या विचारांना आणि कार्याला अभिवादन करण्यात येणार आहे. बाबासाहेबांच्या जीवनकार्याचा आणि त्यांच्या सामाजिक परिवर्तनातील योगदानाचा आढावा संगीत आणि सादरीकरणाच्या माध्यमातून प्रभावीपणे मांडण्यात येणार आहे. अकोला इथं हा कार्यक्रम उद्या १३ एप्रिल  रोजी सायंकाळी ६:३० वाजता प्रमिलाताई ओक सभागृहात आयोजित करण्यात आला आहे.

**हवामान**

विदर्भात तापमानाचा पारा वाढत असून जवळपास सर्व जिल्ह्यांमध्ये उष्णतामान वाढलेलं दिसून येत आहे. आज अकोला इथं  43 पूर्णांक 1 दशांश अंश सेल्सिअस इतकं कमाल तापमान नोंदवण्यात आलं . नागपुरात देखील आज 41 पूर्णांक 2 दशांश अंश सेल्सिअस इतकं कमाल तापमान नोंदवण्यात आलं आहे. वाढत्या उन्हापासून नागरिकांनी स्वतःची काळजी घेण्याचं आवाहन करण्यात आलं आहे.

**अमरनाथ यात्रा**

वार्षिक अमरनाथ यात्रा यंदा 3 जुल□ते 28 ऑगस्ट दरम्यान असेल अशी घोषणा जम्मू काश्मीरचे नायब राज्यपाल मनोज सिन्हा यांनी समाज मध्यमावरच्या पोस्ट मध्ये केली आहे. ज्येष्ठ पौर्णिमेच्या निमित्ताने 29 जून रोजी भगवान शिवाची प्रथम पूजा

होईल. या यात्रेसाठी आगाऊ नोंदणी 15 एप्रिल पासून ऑनलाइन आणि ऑफलाईन पद्धतीनं सुरू होईल. देशभरातल्या जम्मू आणि काश्मीर बँक, पंजाब नॅशनल बँक, स्टेट बँक ऑफ इंडिया आणि येस बँक या बँकांच्या एकूण ५५४ शाखांमध्ये नोंदणीची सुविधा उपलब्ध असेल.